# सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ

## (पूर्वीचे पुणे विद्यापीठ)

### जाहीर प्रकटन

या जाहीर प्रकटनाव्दारे सर्व संबंधितांना कळविण्यात येते की, महाराष्ट्र शासनाच्या उच्च व तंत्रशिक्षण विभागातील 'उच्च व तंत्र शिक्षण मंत्रालय @ पुणे' हा उपक्रम गुरूवार दि. १८ फेब्रुवारी २०२१ रोजी इनडोअर हॉल, क्रीडा संकुल सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ येथे सकाळी ११.०० वाजता आयोजित करण्यात आलेला आहे. या उपक्रमांतर्गत महाराष्ट्र राज्याचे मा. उच्च व तंत्रशिक्षण मंत्री मा. ना. श्री. उदय सामंत व उच्च व तंत्रशिक्षण विभागातील मंत्रालय व सचिव स्तरावरील अधिकाऱ्यांसमवेत सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठात प्रत्यक्ष उपस्थित राहून विद्यार्थी, पालक, शिक्षक, शिक्षकेतर सेवक, विद्यापीठ अधिकारी व कर्मचारी, प्राचार्य व शैक्षणिक संस्था आदी विविध घटकांच्या अडी–अडचणी ऐकून घेवून त्या सोडविणार आहेत.

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाने सर्व संबधित घटकांच्या सोयीसाठी विद्यापीठाच्या www.unipune.ac.in या संकेतस्थळाच्या मुखपृष्ठावर 'उच्च व तंत्रशिक्षण मंत्रालय @ पुणे' ही वेबलिंक निर्माण केलेली आहे. येथे संबंधितांना इंग्रजी अथवा युनिकोड मराठीतून आपले प्रश्न मांडता येणार आहेत. निवेदनाची/तक्रार अर्जाची Soft copy जोडण्याची/अपलोड करण्याची व्यवस्था तेथे उपलब्ध आहे. त्यानुसार पुणे, अहमदनगर व नाशिक जिल्हयातील संबंधितांना कळविण्यात येते की, त्यांनी आपले अर्ज / निवेदन बुधवार दि. १७ फेब्रुवारी, २०२१ रोजी दुपारी ४ वाजेपर्यंत सादर करावेत.

ज्यांना Online अर्ज / निवेदन सादर करणे शक्य झाले नाही अशांनी प्रत्यक्ष कार्यक्रमस्थळी उपस्थित राहून मा. मंत्री महोदयांना आपले निवेदन सादर करावे.

गणेशखिंड, पुणे –४११ ००७.
जा.क्र. जस/१५/
दि. १३ फेब्रुवारी २०२१

डॉ. प्रफुल्ल पवार
कुलसचिव

**प्रत माहितीसाठी व योग्य त्या पुढील कार्यवाहीसाठी रवाना**

**मा. प्राचार्य/संचालक सर्व संलग्नित महाविद्यालये व मान्यता प्राप्त संस्था**